# पिपंरी चिचंवड पोलीस आयुक्तालय
# हिंजवडी पोलीस स्टेशनच्या कारवाईची
# प्रेसनोट दिनांक २१/०७/२०२२

## वाहन चोरी करणाऱ्या टोळीतील चोराला हिंजवडी पोलीसांनी ठोकल्या बेडया त्याचेकडून १५ चोरलेल्या दुचाकी जप्त.

वाहन चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता मा.श्री अंकुश शिंदे सो पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, यांनी मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी उपाय योजना राबविण्यास सांगितल्या असताना हिंजवडी पोलीस ठाणे यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ.विवेक मुगळीकर यांनी पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदार यांना वाहन चोरीचे गुन्हे प्रतिबंध करण्याचे अनुषंगाने व तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सुचना व मार्गदर्शन केले असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस ठाणे यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे बावधन चौकीचे मर्शलवरील सहा.पोलीस उपनिरीक्षक साळुंके व पोलीस हवालदार ८२१ सावंत हे पोलीस मित्र नामे गिरीष गायकवाड यांचेसह हे बावधन परिसरात रात्रगस्त करीत असताना त्यांना एक इसम हा रामनगर बावधन परिसरात संशयीत रित्या फिरतांना दिसल्याने त्यास त्यांनी ताब्यात घेवुन त्याचा नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचा नाव व पत्ता असिफ शेरखान पठाण वय २१ वर्षे रा. मु.पो.सुसगाव,शेख कॉलेजवळ ता.मुळशी जि.पुणे मुळगाव टाकळी सिंकदर ता.मोहोळ जि.सोलापुर असा असल्याचा सांगितला असता त्यास सदर परिसरात फिरण्याचे कारण विचारणा केली असता तो उडवा उडवीची उत्तरे देवुन त्याचेवरील संशय अधिक बळावल्याने त्याचेकडे कसुन विचारपुस केली असता तो सदर परिसरात मोटार सायकल चोरी करण्यासाठी आल्याचे सांगितले. त्यास ताब्यात घेवुन तपास पथकातील सहा.पोलीस निरीक्षक सागर काटे,राम गोमारे व तपास पथकातील अंमलदार यांनी असिफ पठाण याचेकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता त्याने त्याचा साथीदार नितीन पांडुरंग साबळे रा.सुसगाव पुणे याचेसह हिंजवडी पोलीस ठाणेकडील गु.र.नं. ६६०/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे दाखल गुन्हा व इतर गुन्हे केल्याचे कबुल केल्याने त्यास हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नं.६६०/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे दाखल गुन्हयात अटक करुन त्याचेकडे अटक मुदतीत तपास केला असता त्याने व त्याचे इतर दोन साथीदार पाहिजे आरोपी नामे नितीन पांडुरंग साबळे रा. सुसगाव पुणे व अनिकेत अमर ढगे रा.सुसगाव पुणे यांनी पुणे शहर व पिंपरी चिंचवड परिसरातील खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे.

१) हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नं.६६०/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
२) हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नं.४००/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
३) शिवाजीनगर पोलीस ठाणे गु.र.नं.७०/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
४) शिवाजीनगर पोलीस ठाणे गु.र.नं.७२/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
५) सिंहगड पोलीस ठाणे गु.र.नं.३०८/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
६) सिंहगड पोलीस ठाणे गु.र.नं.३०९/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
७) भा.विदयापीठ पोलीस ठाणे गु.र.नं.३५३/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
८) भा.विदयापीठ पोलीस ठाणे गु.र.नं.४७९/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.

९) दत्तवाडी पोलीस ठाणे गु.र.नं.१६७/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
१०) कोथरुड पोलीस ठाणे गु.र.नं.१४७/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
११) चंदननगर पोलीस ठाणे गु.र.नं.२५४/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
१२) वारजे पोलीस ठाणे गु.र.नं.२७२/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
१३) वाकड पोलीस ठाणे गु.र.नं.३५२/२०२२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे

येणेप्रमाणे दाखल गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असुन त्यांचेकडुन वरील गुन्हयातील चोरीस गेलेल्या १३ व २ बिनधनी मोटार सायकल अशा एकुण ४,४५,०००/- रुयपे किंमतीच्या १५ मोटार सायकल जप्त करण्यात आल्या आहेत.

तसेच यातील अटक आरोपी याचे इतर साथीदार नामे नितीन पांडुरंग साबळे व अनिकेत अमर ढगे यांचेवर पुणे शहरात विविध पोलीस ठाणेत अनेक गुन्हे दाखल असुन पाहिजे आरोपी नामे अनिकेत अमर ढगे यांचेवर बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर यांनी मोका कायदयांतर्गत सन २०१७ मध्ये कारवाई केली आहे.

सदरची कामगीरी मा.श्री अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मा. श्री संजय शिंदे साो अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मा. श्री आनंद भोईटे साो, पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मा. श्री श्रीकांत डिसले साो,सहा.पोलीस आयुक्त वाकड विभाग पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मा.श्री डॉ.विवेक मुगळीकर साो,वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तायल व मा. श्री सुनिल दहिफळे, सोन्याबापु देशमुख पोलीस निरीक्षक (गुन्हे)साो, हिंजवडी पोलीस ठाणे,पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील सागर काटे,राम गोमारे सहा.पोलीस निरीक्षक, सहा.पोलीस उप निरीक्षक बंडु मारणे, नितीन साळुंके,बाळकृष्ण शिंदे, पो हवा. आबा सावंत बापु धुमाळ,कैलास केंगले,विक्रम कुदळ,योगेश शिंदे, पोलीस नाईक रितेश कोळी, अरुण नरळे, श्रीकांत चव्हाण, चंद्रकांत गडदे, पोलीस शिपाई अमर राणे,कारभारी पालवे,ओमप्रकाश कांबळे व दत्तात्रय शिंदे व परिमंडळ २ ऑफिसचे पोलीस उप निरीक्षक पवार व पोलीस शिपाई पंडीत यांनी केली.

( आनंद भोईटे)
पोलीस उप आयुक्त ,परि-२
पोलीस आयुक्तालय पिपंरी चिचंवड